०१

कार्यक्रम पत्रिका क्र. (३/२०२६)

स्थायी समिती सभा

दिनांक- ०१.०४.२०२६

प्रति,

मा. ---------------------------------------------------------------

स्थायी समिती सदस्य / सदस्या,

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिका मा. स्थायी समिती सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिका स्थायी समितीची सभा गुरुवार दि. ०२/०४/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील स्थायी समिती सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

सतिश वसंतराव मुळीक,
सभापती,
स्थायी समिती.

******************************************************************************

## परिशिष्ठ

०१ विषय क्र. १ : मागील सभा दि. २७/०३/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

०२ विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शहरात मोठ्या प्रमाणात साजरी करणेबाबत क्रांती अब्राहम आवळे, सदस्या यांनी दि. ३०/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

विषय क्र. ३ : मा. सभापती, स्थायी समिती यांचे परवानगीने घेणेत येणारे ऐनवेळचे विषय.

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०१

स्था. स. ठराव क्र. ०१
दि. ०२/०४/२०२६

विषय क्र. १ : मागील सभा दि. २७/०३/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव**

मागील दि. २७/०३/२०२६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्र. नगरसचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवले ते योग्य व बरोबर असलेने कायम करणेत येत आहे.

सूचक : र. सा. रजपुते

अनुमोदक : नि. कि. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०१

स्था. स. ठराव क्र. ०२
दि. ०२/०४/२०२६

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शहरात मोठ्या प्रमाणात साजरी करणेबाबत क्रांती अब्राहम आवळे, सदस्या यांनी दि. ३०/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शहरात मोठ्या प्रमाणात साजरी करणेबाबत क्रांती अब्राहम आवळे, सदस्या यांनी दि. ३०/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करणेबाबत मागासवर्गीय कल्याण समितीने ठराव क्र. १ दि. ०२/०४/२०२६ नुसार शिफारस केली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५ व्या जयंती निमित्त शहरातील सर्व पुतळयांची व डेक्कन चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वागतकमान रंगरंगोटी करणेत यावी. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कामगार चाळ येथील अर्धपुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल नजीकचा अर्धपुतळा तसेच स्टेशन रोडवरील पुर्णाकृती पुतळा व डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर (डेक्कन चौक) येथे विद्युत रोषणाई करणेत यावी.

यावर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती असल्याने यावर्षा करीता खालील प्रमाणे कार्यक्रमांचे आयोजनही करणेत यावे.

| अ.क्र | कार्यक्रमाचे नाव | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | रफिक पटेल | १४/०४/२०२६ | इंदिरा नगर (प्रभाग क्रमांक ७) |
| २ | भिम वंदना | १५/०४/२०२६ | क्रांती चौक (प्रभाग क्रमांक ९) |
| ३ | भिम गीते | १५/०४/२०२६ | कामगार चाळ (प्रभाग क्रमांक १०) |
| ४ | भिम गीते | १५/०४/२०२६ | रेनुका नगर (प्रभाग क्रमांक १०) |
| ५ | सलाम संविधान | १६/०४/२०२६ | आंबेडकर नगर (प्रभाग क्रमांक ३) |
| ६ | आम्ही भिम यात्री | १६/०४/२०२६ | बौध्द समाज मंदीर, शहापुर (प्रभाग क्रमांक १) |
| ७ | सलाम संविधान | १८/०४/२०२६ | नेहरु नगर (प्रभाग क्रमांक १०) |
| ८ | तुफानातील दिवे | १९/०४/२०२६ | आवळे गल्ली (प्रभाग क्रमांक ९) |
| ९ | तुफानातील दिवे | २०/०४/२०२६ | सिद्धार्थ हौसिंग सोसा. (प्रभाग क्रमांक १०) |
| १० | सलाम संविधान | २२/०४/२०२६ | जय भिम नगर (प्रभाग क्रमांक ६) |
| ११ | रनजीत कांबळे | २४/०४/२०२६ | गाव भाग बौध्द विहार (प्रभाग क्रमांक १६) |
| १२ | शितल साठे | २५/०४/२०२६ | साईट नं १०२ (प्रभाग क्रमांक ७) |

वरील प्रमाणे कार्यक्रमांकरीता रु. १० लाख खर्च करणेस व त्यासाठी आयुक्त यांनी आवश्यकती कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : ना. बा. पोवार

अनुमोदक : नि. कि. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner